क्र.पोमसं/१४/६६/पत्रव्यवहार-परिपत्रक/४४५/२०१९ मुंबई, दि. १३/०८/२०१९

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/ १४/६६/फौसंप्र-१९७ /२००२, दिनांक १५/०५/२००२.
२) परिपत्रक क्र. पोमसं /१४/ ६६/वि.स.मुल्ला व इतर रायगड/ १७२/२०१७, दिनांक ०७/०४/२०१७.
३) परिपत्रक क्र.. पोमसं/१४/६६/१९६-परिपत्रक/२०८/२०१७, दिनांक १५/०४/२०१७.

**विषय :- शासनास प्रस्ताव / पत्रव्यवहार योग्य कार्यपध्दतीने सादर करणेबाबत.**

**************

*परिपत्रक :-*

या कार्यालयाच्या असे निर्दशनास आले आहे की, पोलीस घटकांकडून प्रस्ताव/अहवाल/अभिप्राय इत्यादीबाबतचा पत्रव्यवहार शासनास परस्पर करण्यात येतो. अशा प्रकरणात निर्णय न घेता सदर प्रकरणे शासनाकडून या कार्यालयाच्या अभिप्रायासाठी परत पाठविली जातात.

२. पोलीस घटकप्रमुखांनी सादर केलेले प्रकरण हे विहित नियमांनुसार व आवश्यक बाबी नमूद करुन योग्य त्या कागदपत्रांसह सादर केले आहे किंवा कसे? याबाबत या कार्यालयाच्या स्तरावर छाननी होवून कार्यालयाचे अभिप्रायासह शासनास प्रकरण सादर करणे अपेक्षित असते. परंतू याबाबत कार्यालयाचे संदर्भाधीन परिपत्रकान्वये वारंवार सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असूनही घटकांकडून या बाबींचे पालन केले जात नाही व प्रकरणे परस्पर शासनास सादर केली जातात. सदर प्रकरणांबाबत या कार्यालयाचे अभिप्राय नसल्याने शासन त्यांवर निर्णय घेत नाही परिणामी प्रकरणे प्रलंबित राहतात, ही बाब कार्यालयीन कार्यपध्दतीस अनुसरुन नाही.

३. उपरोक्तबाबत नमूद करण्यात येते की, पोलीस महासंचालक हे सर्व पोलीस विभागाचे विभागप्रमुख असल्याने कार्यालयीन प्रचलित कार्यपध्दतीनुसार घटकप्रमुखांनी शासनास सादर करावयाचे प्रस्ताव/अहवाल/अभिप्राय त्यांचे वरिष्ठांचे मार्फतीने (उदा. पोलीस अधीक्षक यांनी परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांचेमार्फतीने) पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

४. तरी, खालील नमूद सर्व पोलीस घटकप्रमुखांना सूचित करण्यात येते की, यापुढे शासनास सादर करावयाची सर्व प्रकरणे परिपुर्ण तसेच स्वयंस्पष्ट असल्याची खात्री करून योग्य त्या मार्फतीने व शिफारशीसह या कार्यालयाच्यामार्फतीने सादर केली जातील याची दक्षता घ्यावी.

**( मिलिंद भारंबे )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,(लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य,पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक व अपर पोलीस महासंचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, म.राज्य, पुणे.

सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक, परिक्षेत्रीय (महिला अत्याचार प्रतिबंधक
विभाग,म.राज्य मुंबई/ मोटार परिवहन पुणे/रा.रा.पो.बल पुणे/नागपूर/महाराष्ट्र
गुप्तवार्ता प्रबोधिनी, वडाची वाडी, पुणे/नक्षल विरोधी अभियान, नागपूर/फोर्स वन, मुंबई).
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र.
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा/रेल्वे/बिनतारी संदेश)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. १ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये/ गुन्हा अन्वेषण प्रकटीकरण विभाग, नाशिक.

**प्रत माहितीस्तव :-**

अपर पोलीस महासंचालक, का.व सू./ प्रशासन/ आस्थापना/ तरतूद/ नि.व स./ विशेष कृती

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता :-**

पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, म.रा.,मुंबई.

२/- यांनी वरील परिपत्रक कृपया महाराष्ट्र पोलीस विभागातील संकेतस्थळावर कायमस्वरुपी प्रसिध्द उपलब्ध करावे.

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ३६.